# *  पंचायत समिती त्र्यंबकेश्वर  जि. नाशिक *

## * महाराष्ट्र शासकीय कर्मचा-याच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील ८ मधील तरतुदीनुसार पंचायत समिती त्र्यंबकेश्वर नागरीकांची सनद प्रसिध्द करीत आहे. *

## :- नागरिकांची सनद -:

नागरीकांची सनद म्हणजे सरकारचे लोकांसाठीचे उतरदायित्व (Accountability ) दर्शविणारा दस्तऐवज असतो. जनतेच्या  अपेक्षा वाढत आहेत. त्या पुर्ण करण्याच्या दिशेने सरकारने टाकलेले पाऊल  म्हणजे नागरीकांची सनद होय .

महाराष्ट्र शासकीय कामाकत विंलब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००५ मधील कलम १० मध्ये आत नागरीकांच्या सनदेची तरतुदकेली असल्याने नागरीकांची सनद प्रसिध्द करणे ही प्रत्येक विभागाची व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची कायदेशीर जबाबदारी आहे.

## प्रस्तावना  :-

**१) पंचायत समिती त्र्यंबकेश्वर** :- जिल्हा परिषद ,नाशिक मधील एक विभाग असुन त्यात सर्वसाधारण १८ संकलन असुन  प्रशासन, आस्थापना १ ते ४ आवक-जावक, अर्थ ,कृषी, पशुसंवर्धन आरोग्य ग्रामपंचायत , समाजकल्याण, सांख्यिकी, महात्मा गांधी रोजगार हमी योजना शिक्षण, इंदिरा आवास योजना, अर्थसंकल्प, विस्तार अधिकारी यांच्या फिरती कार्यक्रम व मासिक दैनंदिनी मंजुर करणे ,पंचायत समिती सर्वसाधारण सभा, समन्वय सभा वा इतर सभेची माहिती संकलित करणे , जिल्हा परिषद वर्ग- व वर्ग-४ कर्मचा-यांच्या आस्थापना विषयक  कामे करणे.

विविध विभागामार्फत पुरविण्यात येणा-या सेवांच्या कार्यपुर्तिचे वेळापत्रक परिशिष्ट-१ मध्ये स्तभ क्रमांक ४ येथे सादर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-याचे बदल्यांचे विनयमन व

शासकीय कर्मव्ये पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र ३ च्या कलम ११ मध्ये नमुद केलेल्या एकुण ६ बाबी खालील प्रमाणे

**(एक)** न्यायप्रविष्ट

**(दोन )** लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग इत्यादी.

**(तीन )** न्यायिकवत बाबी

**(चार )** केद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबधातील प्रकरणे

**(पाच)** विधी विधानाशी संबधातील बाबी

**(सहा)** मंत्रिमंडळा इस सादर होणा-या मुख्य धोरणात्मक बाबीसंबधी प्रकरणे

वरील एकुण ६ (सहा ) बाबी कार्यपुर्तीच्या वेळापत्रकातील परिशिष्ट -१ मधील स्तंभ क्रमांक ४ येथिल वेळापत्रक सुट राहील.

**५)(अ) ग-हाणी / तक्रारी यांचे निराकरण :-** कार्यपुर्तीस होणार विलंब वा अप्य ग-हाणी असल्यास त्यासंबधी परिशिष्ट १ मधील स्तभ क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या अधिका-याकडे तक्रार नांदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासुन ७ दिपसांत ज्याची पुर्तता करण्याची जबाबदारी संबधित अधिका-याची राहील. यानंतरही नागरीकांचे समाधान न झाल्यास संबधित म. मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे याबाबत त्यांना तक्रार करता येईल. ग-हाणी समक्ष भेटीने/ पत्राव्दारे मांडता येतील.

**५(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन :-**

या नागरीकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणामकारकतेचा आढावा पशुसंवर्धन विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

**५(क) जनसामान्यांकडून सुचना :-**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांर्भीयपुर्वक विचार करुन त्यात वेळोवळी सुधारणा घडवुन आणता

येतील. पंचायत समिती त्र्यंबकेश्वर अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

६) नागरीकांच्या सनदेची अमंलबजावणी :- पंचायत समिती त्र्यंबकेश्वर नागरिकांच्या या सनदेची अमंलबजावणी करण्यास कटीबध्द आहे. पशुसंवर्धन विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्ये भावनेने व कार्यतत्परतंने उपलब्ध करुन देण्याची जबाबदरी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांची राहील.

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-याचे बदल्याचे विनयमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र ३ च्या कलम १० (१) मधील तरतुदीस अनुसरुन प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्यास नेमुन दिलेल्या किंवा त्याच्याशी संबधि असलेले शासकीय कर्तव्ये व शासकीय काम अंत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शाीघ्रतेने पार पाडण्यास बांधील असेल.

सर्वसाधारणपणे , कोणतीही फाइल विभागातील किंवा कार्यालयातील कोण्त्याही शासकीय कर्मचाःयाकडे कामाच्या सात दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही . परंतु तात्काळ आणि तातडीच्या स्वरुपाच्या फाईल , त्या प्रकरणाच्या निवडीनुसार शक्य तितक्या शिघ्रतेने आधि प्राधान्याने तात्काळ फाईल शक्यतो एका दिवसात किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी आणि तातडीचे स्वरुपाची फाईल शक्यतो चार दिवसात निकाली काढण्यात येईल . परंतु दुसऱ्या काणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यक्यता नसलेल्या फाईलींच्या संबधात संबधित विभाग त्या प्रकरणावर पंचेचाळीसदिवसाच्या आत निर्णय घेईल आणि अवश्यक ती कार्यवाही करील आणि दुस-याकोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची अवश्यकता असलेल्या फाईलीच्या संबधात तीन महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल आणि आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

## **हातपंप गोषवारा**

## **हातपंप वर्गणी सन २०१४-२०१५ अखेरचा गोषवारा**

१) एकुण हातपंप संख्या :- १७०

२) एकुण ग्रामपंचायतीची संख्या :-५५

३) मागील वसुल करावयाची रक्कम :- ५००

४) सन २०१४-२०१५ ची मागणी रक्कम :- १,७०,५००/-

५) एकुण वसुल करावयाची रक्कम :-१,७०५००/-

६) एकुण वसुल झालेली रक्कम :-१,७०५००/-

७) ३१ मार्च २०१५ अखेर थकबाकी रक्कम:- निरंक

हातपंप वसुली २०१४-२०१५ १०० %

सन२०१३-२०१४ या वर्षातील जादा वसुल-९०००/-

गट विकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

जा.क्र./पंसत्र्य/ग्रापं/ १००१ /२०१३
पंचायत समिती कार्यालय त्र्यंबकेश्वर
दिनांक २९/१०/२०१३

प्रति,
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक
ग्रामपंचायत :-सर्व
ता.त्र्यंबकेश्वर जि. नाशिक

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) अन्वये वग करणे बाबत.
संदर्भ :- श्री.नारायण जिवला आसम रा.सापतपाली पो.नाचलोंढी ता.त्र्यंबकेश्वर जि. नाशिक

वरील संदर्भिय विषयान्वये श्री नारायण जिवला आसम रा.सापतपाली यांनी केंद्रीय माहितीचा अधिकारअधिनियम २००५ नुसार माहिती मिळणेकामी अर्ज याकार्यालयास सादर केलेला आहे.अर्जदार यांनी मागितलेली माहिती हीआपले कार्यकक्षेतील असल्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक यांचे कडिल आदेशक्रमांक साप्रवि/माहितीसेल/२१७ दिनां २०/४/२०१३ चे सुधारीत आदेशान्वये जनमाहिती अधिकारी आपणअसल्याने सदरचा मुळ अर्ज केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(३)
अन्वये आपलेकडेस हस्तांतर करण्यात येत आहे. अर्जदार यांना मुदतीत माहिती पुरविणेत यावी.

सोबत :- अर्जाची छांयाकित प्रत

शासकिय माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रापं)
पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

प्रतः- श्री नारायण जिवला आसम रा.सापतपाली पो नांचलोढी

२/- आपण दिनांक २७/९/२०१३ अन्वये केंद्रिय माहितीचा अधिकारअधिनियम अन्वये अर्ज सादर केलला असुन आपणास हवी असलेली माहिती ही ग्रामपचायत स्तरावरील असलेने ग्रामपंचायत स्तरावर जनमाहिती अधिकारी हे ग्रामसेवक असल्याने केद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चेकलम ६(३) अन्वये त्यांचे कडे आपला अर्ज हस्तांतरीत करण्यात येत आहे

शासकिय माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रापं)
पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

जा.क्र./पंसत्र्य/ग्रापं/ /२०१३
पंचायत समिती कार्यालय त्र्यंबकेश्वर
दिनांक / १०/२०१३

प्रति,
श्री नारायण जिवला आसम

रा. सापतपाली  पो. नाचलोढी
ता.त्र्यंबकेश्वर  जि. नाशिक

विषय :- केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) अन्वये
संदर्भ :-  आपला दिनांक २७/९/२०१३  चा अर्ज

वरील संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, माहितीचा अधिकार   अधिनियम २००५ मधील सुधारणा दिनांक २४/९/२०१० नुसार सदरची  माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरची  असल्याने सदर ठिकाणी स्वतंत्र जनमाहिती अधिकारी  असुन उपरोक्त सुधारणेनुसार संबधित अर्जदाराने स्वातंत्र्य रित्या प्रत्येक जनमाहिती अर्जदाराकडे स्वांतत्र्य अर्ज  करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

सोबत :- प्रत जोडलेली आहे.

शासकिय माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रापं)
पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

शासकिय माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रापं)
पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

शासकिय माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रापं)
पंचायत समिती त्र्यंबकेश्वर

प्रत

शासकिय माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रापं)
पंचायत समिती त्र्यंबकेश्वर